मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कुदळवाडीतील विष्णु ग्रीन्स परिसरातील कचरा समस्येवर 15 दिवसांत कायमस्वरूपी उपाययोजना

## महापौर रवि लांडगे यांचे निर्देश, कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण आणि बेकायदेशीर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

कुदळवाडी परिसरातील विष्णुग्रीन्स सोसायटीसमोरील कचरा साचण्याची समस्या तसेच स्थानिक नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांची महापौर रवि लांडगे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि तक्रारी जाणून घेतल्या.



"कुदळवाडी परिसरातील विष्णु ग्रीन्स सोसायटीसमोरील कचरा समस्या ही केवळ स्वच्छतेचा विषय नसून नागरिकांच्या आरोग्य आणि पर्यावरणाशी संबंधित अत्यंत गंभीर बाब आहे. या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना पुढील १५ दिवसांत प्रभावी उपाययोजना पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम करून प्रदूषण करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांच्या हिताशी संबंधित कोणत्याही प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाणार नाही.

- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका.

पाहणीदरम्यान नागरिकांनी परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचत असल्याने निर्माण होणारी अस्वच्छता, वारंवार प्लास्टिक, टायर व इतर भंगाराला आग लावून होणारे वायू प्रदूषण तसेच परिसराच्या स्वच्छतेसंदर्भातील विविध प्रश्न मांडले. या सर्व बाबींची महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर माहिती घेतली.

त्यानंतर महापौर रवि लांडगे यांनी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांच्यासमवेत सविस्तर चर्चा केली. यावेळी कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, नियमित स्वच्छता, बेकायदेशीर कचरा टाकण्यावर नियंत्रण, प्रदूषण रोखण्यासाठी समन्वित कार्यवाही तसेच नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने प्रतिसाद देण्याबाबत निर्देश देण्यात आले.

यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना पुढील १५ दिवसांच्या आत विष्णु ग्रीन्स परिसरातील कचरा समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट आदेश महापौर रवि लांडगे यांनी दिले. तसेच कचरा साचणार नाही, परिसर कायमस्वरूपी स्वच्छ राहील आणि प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या प्रकारांवर कठोर कारवाई होईल, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांनाही शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. परिसरात बेकायदेशीरपणे कचरा टाकणे किंवा जाळण्याच्या घटना आढळल्यास त्याची माहिती तातडीने महापालिकेला देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेला अर्बन चॅलेंज फंडाचा आधार; रखडलेल्या मोठ्या प्रकल्पांना मिळणार गती

## आर्थिक संकटामुळे कर्जाची गरज; पाणीपुरवठा, ड्रेनेज, नदी सुधारणा आणि कचरा व्यवस्थापन प्रकल्पांना निधी मिळण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रीमंत असा नावलौकिक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक स्थिती बिघडली आहे. त्यामुळे महापालिकेवर मोठ्या व खर्चिक विकासकामांसाठी कर्ज घेण्याची वेळ आली आहे. केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेंज फंडातून (शहरी आव्हान निधी) कर्ज मिळण्यासाठी महापलिका प्रशासनाने प्रस्ताव दिले होते. अखेर, त्याला हिरवा कंदील मिळाला आहे. ते मोठे प्रकल्प आता मार्गी लागतील, अशी शक्यता निर्माण झाली आहे.



### अत्यावश्यक प्रकल्प मार्गी लागणार

» पिंपरी-चिंचवड महापालिकेने मोठ्या व खर्चिक प्रकल्पांसाठी केंद्राच्या अर्बन चॅलेंज फंडात प्रस्ताव सादर केले होते. त्यातील काही प्रकल्पांना निधी देण्यास नुकतीच मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे शहरासाठी अत्यावश्यक असलेले प्रकल्प आता मार्गी लागतील, असे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे यांनी सांगितले.

महापालिकेतील प्रशासकीय राजवटीत मोठ्या प्रमाणात उधळपट्टी करण्यात आली. त्यात तत्कालीन आयुक्त शेखर सिंह हे अग्रसेर होते, असा आरोप विरोधकांनी वारंवार केला आहे. त्या उधळपट्टीच्या धोरणामुळे महापालिकेवर तब्बल ४ हजार ५०० कोटी रुपयांचे देणे निर्माण झाले आहे. विकासकामांसाठी महापालिकेच्या ठेवी मोडण्यात येत आहेत. तसेच, बँका आणि वित्तीय संस्थांकडून कर्ज करण्यासाठी महापालिका प्रशासनाची धडपड सुरू आहे. दोनशे कोटी रुपयांचे म्युनिसिपल बॉण्डनंतर २०० कोटी रुपयांचे ग्रीन बॉण्डच्या कर्जातून एकूण ४०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यात आला होता.

निधीअभावी अनेक मोठे प्रकल्प रखडले आहेत. पवना बंद जलवाहिनी प्रकल्प, पवना नदी सुधार प्रकल्प, मुळा नदी सुधार प्रकल्प तसेच, संपूर्ण शहरात नवीन ड्रेनेजलाईन टाकणे, सध्याचे मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्रांची (एसटीपी) क्षमता वाढविणे, मोशी कचरा डेपोत दुसरा वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारणे. कासारवाडी येथे मैलासांडपाण्याचा पुनर्वापर केंद्र विकसित करणे हे प्रकल्प कागदावरच आहेत. त्या प्रकल्पांना गती देण्यासाठी तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यकाळात केंद्राच्या अर्बन चॅलेंज फंड अभियानात प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यासाठी प्रशासनाकडून पाठपुरावा सुरू आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये इंटरनेट केबल्सचे जाळे; लटकत्या तारांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## पदपथ, झाडे आणि विद्युत खांबांवर अनधिकृत केबल्सचा पसारा; सर्वेक्षण करून कारवाईची नागरिकांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील महामार्ग, अंतर्गत रस्ते, चौक, विद्युत खांब आणि झाडांवर इंटरनेट केबल्सचे जाळे दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक ठिकाणी या केबल्स थेट पादचारी मार्गावर, सायकल ट्रॅकवर लटकलेल्या अवस्थेत दिसून येत आहेत. या लटकणाऱ्या केबल्समुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून शहराच्या सौंदर्यासही बाधा निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

शहरातील अनेक भागांत केबल्स डोक्याच्या उंचीवर किंवा पदपथावर लटकलेल्या अवस्थेत आढळून येतात. ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि दुचाकीस्वारांना या केबल्समुळे अडथळा निर्माण होत असून,अपघाताची शक्यता वाढत असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

इंटरनेट सेवा पुरवठादारांनी नियमानुसार भूमिगत केबल टाकण्याऐवजी अनेक ठिकाणी कोणतेही नियोजन न करता खांबांवर व झाडांवर केबल्स टाकल्या आहेत. परिणामी शहरभर केबल्सचे जाळे तयार झाल्याचे चित्र आहे.

स्मार्ट सिटीची ओळख स्वच्छ, सुरक्षित आणि नियोजनबद्ध पायाभूत सुविधांमुळे असते; मात्र शहरभर लटकलेल्या केबल्समुळे ही संकल्पना धूसर होत असून शहराच्या सौंदर्यासही गालबोट लागते.

नागरिकांनी प्रशासनाने तातडीने सर्वेक्षण करून अनधिकृत केबल्स हटवाव्यात, तसेच सर्व इंटरनेट केबल्स सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने भूमिगत करण्याची सक्ती करावी, अशी मागणी केली आहे.

अनेक झाडांच्या फांद्यांमध्ये इंटरनेट केबल्स लटकलेल्या अवस्थेत दिसत आहेत. वाऱ्यामुळे या केबल्स तुटुन आणखी खाली पडतात. त्यामुळे पादचाऱ्यांचा पाय अडकण्याचा शक्यता निर्माण होऊ शकतो; तसेच त्या परिसरातून जाणाऱ्या दुचाकीस्वारांच्या जीवासही धोका उद्भवू शकतो. झाडांच्या छाटणीच्या कामातही मोठा अडथळा निर्माण होत असल्याचे त्या विभागाकडून सांगण्यात आले.

पिंपरी-चिंचवडमधील महामार्ग, अंतर्गत रस्ते, चौक, विद्युत खांब आणि झाडांवर इंटरनेट केबल्सचे जाळे दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक ठिकाणी या केबल्स थेट पादचारी मार्गावर, सायकल ट्रॅकवर लटकलेल्या अवस्थेत दिसून येत आहेत. या लटकणाऱ्या केबल्समुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून शहराच्या सौंदर्यासही बाधा निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि दुचाकीस्वारांना या केबल्समुळे अडथळा निर्माण होत असून,अपघाताची शक्यता वाढत असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.



### झाडांमध्ये अडकलेल्या केबल्स

» अनेक झाडांच्या फांद्यांमध्ये इंटरनेट केबल्स लटकलेल्या अवस्थेत दिसत आहेत. वाऱ्यामुळे या केबल्स तुटुन आणखी खाली पडतात. त्यामुळे पादचाऱ्यांचा पाय अडकण्याचा शक्यता निर्माण होऊ शकतो; तसेच त्या परिसरातून जाणाऱ्या दुचाकीस्वारांच्या जीवासही धोका उद्भवू शकतो. झाडांच्या छाटणीच्या कामातही मोठा अडथळा निर्माण होत असल्याचे त्या विभागाकडून सांगण्यात आले.

### हे करणे गरजेचे

- शहरातील सर्व इंटरनेट केबल्सचे सर्वेक्षण.
- अनधिकृत केबल्स तातडीने हटविणे.
- नव्या केबल्स भूमिगत टाकण्याची सक्ती.
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सेवा पुरवठादारांवर दंडात्मक कारवाई.

> शहरात सार्वजनिक रस्ते, पदपथ, चौक आणि महापालिकेच्या मालमत्तेवर अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या इंटरनेट व फायबर केबल्सची तपासणी करण्यात येते. नियमबाह्य आढळणाऱ्या केबल्स संबंधित सेवा पुरवठादारांना नोटीस देऊन त्या हटविण्याचे आदेश संबंधितांना दिले जातील. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत अतिक्रमणविरोधी कारवाई पालिकेकडून करण्यात येत असते.
>
> **- अतुल पाटील, अतिक्रमण विभागप्रमुख, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# प्रभागातील नागरी समस्या तातडीने सोडवा : सभापती अभिषेक बारणे

## थेरगाव येथील 'ग' (पुरंदर) क्षेत्रीय कार्यालयात प्रभाग समितीची बैठक उत्साहात, विकासकामे व नागरिकांच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा..

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव येथील 'ग' (पुरंदर) क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग समितीची बैठक स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली आज गुरुवारी (ता. 30) पार पडली. बैठकीत प्रभागातील विविध विकासकामांचा आढावा घेतला. तसेच, नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध नागरी समस्यांवर चर्चा करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सभापती बारणे यांनी सूचना केल्या.



प्रभाग समिती अध्यक्षांच्या निवडीनंतर पहिलीच बैठक असल्याने सभापती बारणे यांनी सर्व सदस्यांना सभा कामकाजाची यावेळी माहिती समजवून सांगितली. प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, जलनिस्सारण, सार्वजनिक सुविधा तसेच सुरू असलेल्या आणि प्रस्तावित विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विकासकामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

यावेळी सभापती बारणे यांनी प्रभाग समितीच्या नवनियुक्त अध्यक्षा मनिषा पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा देत प्रभागाच्या विकासासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. कोण कुठल्या पक्षाचा यापेक्षा नारिकांचे प्रश्न किती महत्वाचे आहेत, यावर लक्ष केंद्रीत करुन नागरिकांना सुविधा देण्याची ही संधी आहे. त्यामुळे प्रभाग समितीचे कामकाज सकारात्मक चर्चेतून अधिक प्रभावीपणे पार पाडेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नागरिकांच्या अपेक्षांनुसार विकासकामांना गती देत अधिक सक्षम आणि सुविधायुक्त प्रभाग उभारण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे सभापती बारणे यांनी सांगितले. या बैठकीस प्रभागातील नगरसेवक, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच विविध शाखांचे कर्मचारी उपस्थित होते.

# गुरुचरणी कृतज्ञतेचे पुष्प अर्पण

## ॲपेक्स स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी






**पिंपरी | प्रतिनिधी**

ॲपेक्स स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, चऱ्होली येथे गुरुपौर्णिमेचा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि संस्कारमय वातावरणात साजरा करण्यात आला. गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करत विद्यार्थ्यांमध्ये गुरुजनांप्रती आदर, कृतज्ञता आणि भारतीय संस्कृतीतील मूल्यांची जपणूक व्हावी, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेच्या खजिनदार मीना ठोकळ आणि ज्योती वाळके यांच्या हस्ते महर्षी व्यास पूजन, सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन झाले. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. मानसी गिल पंडित, उपमुख्याध्यापिका लिना तुगडे, विभाग प्रमुख नीलम टोणगे तसेच बालवाटिका विभाग प्रमुख कोमल कदम यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुंच्या महत्त्वावर आधारित प्रभावी भाषणे, भक्तिगीते आणि आकर्षक नृत्य सादर केले.

विशेषतः 'गुरु द्रोणाचार्य आणि एकलव्य' यांच्या गुरुभक्तीवर आधारित हृदयस्पर्शी नाटिका सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. या नाटिकेतून गुरुंबद्दलचा आदर, निष्ठा, समर्पण आणि गुरुभक्तीचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला, तर शिक्षकांनीही गीत व नृत्याच्या माध्यमातून गुरु-शिष्य नात्याचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापिका डॉ. मानसी गिल पंडित म्हणाल्या की, गुरु हा केवळ ज्ञान देणारा शिक्षक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देणारा शिल्पकार असतो. गुरूंच्या मार्गदर्शनातूनच जीवनात शिस्त, संस्कार, प्रामाणिकपणा आणि यशाचा मार्ग सापडतो. आई-वडील आणि गुरु यांचा आदर राखून त्यांच्या शिकवणीचे आचरण करणे, हीच खरी गुरुदक्षिणा असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच चांगले संस्कार, मेहनत, नम्रता आणि कर्तव्यनिष्ठा जोपासून आपल्या जीवनात उच्च ध्येय गाठावे, असे आवाहन त्यांनी केले.

या यावेळी मातृपूजन उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या मातांचे औक्षण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आई आणि गुरु हेच जीवनातील पहिले व सर्वोच्च मार्गदर्शक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या सोहळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये गुरुजनांप्रती आदर, पालकांविषयी कृतज्ञता आणि भारतीय संस्कृतीतील "मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव" या मूल्यांचा दृढ संस्कार करण्यात आला. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

















# पुण्याची लोकसंख्या 81.64 लाखांवर; पाणीपुरवठा, प्रदूषण, आरोग्याची आव्हाने तीव्र

## महापालिकेच्या पर्यावरण स्थिती अहवालात 34 गावांच्या समावेशानंतर वाढत्या लोकसंख्येचा अंदाज

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेची जुनी हद्द, समाविष्ट ३४ गावे आणि 'चल लोकसंख्ये'सह शहरातील सुमारे ८१ लाख ६४ हजार लोकसंख्या पाण्यासाठी महापालिकेवर अवलंबून असेल, असा अंदाज महापालिकेच्या पर्यावरण सद्य:स्थिती अहवालामध्ये वर्तविण्यात आला आहे. शहरातील वायू, जल प्रदूषणाच्या समस्या कायम असून, वाहतूक कोंडीची समस्याही उग्र रूप घेत असल्याचे अहवालातून समोर आले आहे.

महापालिकेच्या पर्यावरण विभागाने २०२५-२६ चा पर्यावरण स्थिती अहवाल सादर केला. यावर पुढील महिन्यात सर्वसाधारण सभेत चर्चा होणार आहे. या अहवालानुसार, पुणे महापालिकेत नव्याने ३४ गावे समाविष्ट झाल्यामुळे किती लोकसंख्या वाढेल, याचा अंदाज बांधण्यासाठी महापालिकेने तज्ज्ञ सल्लागाराची नियुक्ती केली होती. त्यांनी २०११ची जनगणना आणि अन्य शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून, ३४ गावांमध्ये १९ लाख १० हजार ५०७ लोकसंख्या असेल, असा अंदाज व्यक्त केला. त्यामुळे महापालिकेची जुनी हद्द, ३४ समाविष्ट गावे आणि चल लोकसंख्या (फ्लोटिंग लोकसंख्या) अशी एकूण ८१ लाख ६४ हजार ८६८ लोकसंख्या पाणीपुरवठ्यासाठी महापालिकेवर अवलंबून असेल, असा अंदाज व्यक्त केला आहे.

या अहवालानुसार, शहरातील हवेमध्ये 'पीएम २.५' आणि नायट्रोजन डायऑक्साइडच्या पातळीत हळूहळू वाढ होत आहे. रस्त्यांवर वाढणारी वाहनांची संख्या, नदीत सोडले जाणारे दूषित पाणी, वाढणारी बांधकामे, वाढते औद्योगिकीकरण यामुळे प्रदूषणात वाढ होत आहे. प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी व्यावसायिक आस्थापनांना स्वच्छ इंधनाचा वापर बंधनकारक करणे, उघड्यावर कचरा जाळण्यास बंदी घालणे आणि मोठ्या बांधकाम प्रकल्पांवर सेन्सरआधारित धूळ निरीक्षण यंत्रणा बसवण्यासारखे उपाय केले जात आहेत.

शहरात विषमज्वर, विषाणूजन्य कावीळ, कॉलरा आणि जिवाणूजन्य आमांश या चारही रोगांच्या एकत्रित रुग्णसंख्येच्या जवळपास चारपट रुग्ण हे केवळ तीव्र अतिसाराचे असल्याचे महापालिकेने तयार केलेल्या पर्यावरणाच्या सद्य:स्थिती अहवालामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.




### ८१.६४ लाख लोकसंख्येचा पाणीपुरवठा महापालिकेवर

» महापालिकेच्या पर्यावरण स्थिती अहवालानुसार, जुनी शहर हद्द, नव्याने समाविष्ट ३४ गावे आणि चल (फ्लोटिंग) लोकसंख्या मिळून सुमारे ८१ लाख ६४ हजार ८६८ नागरिक पाणीपुरवठ्यासाठी महापालिकेवर अवलंबून असतील. ३४ गावांमध्ये सुमारे १९ लाख १० हजार ५०७ लोकसंख्या असेल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे भविष्यात पाणीपुरवठा, जलस्रोतांचे नियोजन आणि पायाभूत सुविधांवर मोठा ताण येण्याची शक्यता अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

### प्रदूषण आणि वाहतूक कोंडीची समस्या गंभीर

» पर्यावरण स्थिती अहवालात शहरातील वायू आणि जलप्रदूषण सातत्याने वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हवेमधील पीएम २.५ आणि नायट्रोजन डायऑक्साइडचे प्रमाण वाढत असून, वाहनांची संख्या, बांधकामे, औद्योगिकीकरण आणि नदीत सोडले जाणारे दूषित पाणी ही प्रमुख कारणे आहेत. प्रदूषणावर नियंत्रणासाठी स्वच्छ इंधनाचा वापर, उघड्यावर कचरा जाळण्यास बंदी आणि मोठ्या बांधकाम प्रकल्पांवर सेन्सरआधारित धूळ निरीक्षण यंत्रणा बसविण्यासारखे उपाय महापालिका राबवत आहे.

### दूषित पाण्यामुळे अतिसाराचे ९,५९९ रुग्ण

» महापालिकेच्या अहवालानुसार, २०२५ मध्ये शहरात तीव्र अतिसाराचे ९,५९९ रुग्ण आढळले. ही संख्या विषमज्वर, विषाणूजन्य कावीळ, आमांश आणि कॉलरा या चारही आजारांच्या एकत्रित रुग्णसंख्येपेक्षा अनेकपटीने जास्त आहे. कावीळचे १३५, विषमज्वराचे ११०, आमांशाचे १७९ आणि कॉलऱ्याचा १ रुग्ण नोंदविण्यात आला. दूषित पाणी आणि अन्नामुळे हे आजार होत असल्याने उकळलेले किंवा शुद्ध पाणी पिणे, हात स्वच्छ धुणे आणि बाहेरील अन्न टाळण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# पुण्यात 1 ऑगस्टला 'या' भागात वाहतुकीत मोठा बदल; सारसबाग, स्वारगेट परिसरातील रस्ते राहणार

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीच्या औचित्याने पुण्यातील मध्यवर्ती भागातील वाहतूक व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त शनिवारी (१ ऑगस्ट) सारसबाग परिसरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहे. सारसबाग परिसरातील रस्ते वाहतुकीस बंद करण्यात येणार असून, वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

'सारसबाग परिसरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी विविध संस्था, संघटनांचे कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती. सारसबाग परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यापार्श्वभूमीवर शनिवारी (१ ऑगस्ट) सकाळपासून सारसबाग परिसरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहे. या भागातील रस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार असून, वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, तसेच वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे', असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी केले आहे.




**सारसबाग परिसरातील बंद राहणारे रस्ते आणि पर्यायी मार्ग पुढीलप्रमाणे :**

•देशभक्त केशवराव जेधे चौक ते सारसबाग (सिंहगड रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनांनी लक्ष्मीनारायण चित्रपटगृह चौकातून मित्रमंडळ चौक, स्वातंत्र्यवीर सावरकर चौकातून सिंहगड रस्त्याकडे जावे)

•जेधे चौकातील उड्डाणपुलावरुन सारसबागेकडे जाण्यास बंदी (कात्रजकडून येणाऱ्या वाहनचालकांनी उड्डाणपुलावरुन न जाता मित्रमंडळ चौकातून सिंहगड रस्तामार्गे इच्छितस्थळी जावे)

•स्वारगेट परिसरातील व्हेगा सेंटर ते सारसबागपर्यंतचा समतल विलगक (ग्रेट सेपरेटर) वाहतुकीस बंद (वाहन चालकांनी घोरपडे पेठ, राष्ट्रभूषण चौक, हिराबाग, बाजीराव रस्तामार्गे इच्छितस्थळी जावे)

•सारसबागेजळील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते पूरम चौक वाहतूक बंद (स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, सिंहगड रस्ता, दांडेकर पूल चौकमार्गे इच्छितस्थळी जावे)

•दांडेकर पूल, सिंहगड रस्त्यावरुन सारसबागेकडे जाणारी वाहतूक बंद (दांडेकर पूल, नाथ पै चौक, ना. सी. फडके चौक, कल्पना हॉटेलमार्गे टिळक रस्ता, बाजीराव रस्त्याकडे जावे)

•पूरम चौक ते जेधे चौक दरम्यान एकेरी वाहतुकीचे नियम तात्पुरते शिथिल

•दांडेकर पूल ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक दरम्यानची एकेरी वाहतूक गरज भासल्यास दुहेरी

•नीलायम चित्रपटगृहाकडून सारसबागेकडे येणारी वाहतूक पर्वती गावातून

•छत्रपती शिवाजी रस्त्यावरील वाहतूक गरज भासल्यास वळविण्यात येणार

•शंकरशेठ रस्ता ते सारसबाग दरम्यानची वाहतूक पर्यायी मार्गाने

• मित्रमंडळ चौकातील पाटील प्लाझा परिसरात वाहने लावावीत